जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक - ४०० दिनांक - ३०/०५/२०२३

वानवडी पोलिस स्टेशन पुणे शहर

### बी.टी.कवडे रोड,वानवडी येथे कोयत्याचा धाक दाखवून लुटणारे “जबरी चोर” जेरबंद

दि.२१/०५/२०२३ रोजी पहाटे ०४/०० वा.चे सुमारास पहाटे ०४/०० वा.च्या सुमारास फिर्यादी, व त्यांचे दोन मित्र असे सासवड,जि.पुणे येथे मराठी पिक्चरचे शुटींकरीता जाण्याकरीता स्वारगेट येथून असलेली बस पकडणे करीता निघालेले असताना, वानवडी पोलीस ठाणे हददीतील ९३ ॲव्हेंन्यू मॉल,पुणे सोलापूर रोड,येथील बी.टी.कवडे रोडचे लगत असलेल्या चहाच्या टपरीवर चहा पिण्यासाठी थांबले असता,तेथे उभा असलेल्या एका इसमाने जाणीवपुर्वक फिर्यादीस धक्का मारून फिर्यादीस हाताला धरून खेचून त्याचेसोबत टपरी मागील हमरस्त्या लगतचे मोकळया व अडचणीच्या जागेत घेवून जावून,तेथे त्या इसमाचे उभे असलेले साथीदारापैकी एकाने त्याचेकडील धारदार हत्यार काढून फिर्यादीचे मानेवर ठेवले,व फिर्यादीचे पॅन्टच्या खिशातील मोबाईल जबरदस्तीने काढून घेवून धमकी दिली व फिर्यादीला घेवून आलेल्या इसमाने फिर्यादीकडील पॅन्टचे खिशातून जबरदस्तीने असलेले पैसे काढून घेतले.तसेच फिर्यादीचे मित्र हेही फिर्यादीस पाहण्यासाठी आले असता तेथे असलेल्या आणखी दोन इसमांनी त्यांना हाताने मारहाण करून त्याचेकडील असलेले पैसे असा एकुण १९,६००/- रुपये (एकोणीस हजार सहाशे रुपये फक्त) किंमतीचे एक मोबाईल हॅन्डसेट व रोख रक्कम जीवे मारण्याची धमकी देवून जबरदस्तीने काढून स्वतःचे फायदयाकरीता चोरुन नेली आहे.म्हणून फिर्यादीने वरील अनोळखी इसमांविरुध्द कायदेशीर तक्रार दिल्याने गुन्हा दाखल आहे. **सदर गुन्हयाचा तपास पोलीस उप-निरीक्षक संतोष सोनवणे तपास पथक, वानवडी पोस्टे हे करत आहेत.**

सदर दाखल गुन्हयाचे अनुषंगाने तपास पथक प्रभारी पोउपनि संतोष सोनवणे यांनी तपास करत असताना,बी.टी.कवडे रोड येथील गुन्हयातील घटनास्थळावरील साक्षीदार,सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक विश्लेषन करून,वानवडी पोलीस ठाणे कडील तपास पथकातील पो.अं./राठोड,गायकवाड, चोरमले, साळवे,सतार व इतर सर्व पोलीस अंमलदार यांनी मोठया शिताफिने व कौशल्याने गुन्हयातील खालील नमूद आरोपीत यांना जेरबंद करून अटक केली व त्यांचेकडुन **गुन्हयातील व्हीवो कंपनीचा मोबाईल,कोयता तसेच गुन्हयात वापरणेत आलेली दुचाकी मोपेड गाडी असे एकुण रू. ७४,२००/- रक्कमेचा गुन्हयातील मुददेमाल हस्तगत करणेत आलेला आहे.**

गुन्हयातील जबरी चोर आरोपीतांची नावे खालीलप्रमाणे.

१)**स्वप्नील दादा कोतवाल**, वय २३ वर्षे, धंदा. राहणार शिंदे वस्ती, हडपसर,पुणे २)**महेश बबन गजेसिंह**, वय. २९ वर्षे, राहणार राहणार भिमनगर, मुंढवा,पुणे

सदरची कारवाई ही मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशीक विभाग,पुणे शहर श्री.रंजनकुमार शर्मा, मा.पोलीस उपआयुक्त परि.-५,पुणे शहर श्री.विक्रांत देशमुख,मा.सहा.पोलीस आयुक्त वानवडी विभाग पुणे शहर सौ.पौर्णिमा तावरे यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरिक्षक भाऊसाहेब पटारे,पोलीस निरिक्षक गुन्हे संदिप शिवले व तपास पथकातील पोलीस उपनिरिक्षक संतोष सोनवणे,पो.अंम.अमोल गायकवाड, विठठल चोरमले, अतुल गायकवाड, पोहवा/ अमजद पठाण, संतोष नाईक, हरीदास कदम महेश गाढवे,विनोद भंडलकर,पोअं/ संदिप साळवे, विष्णु सुतार,राहुल गोसावी,निलकंठ राठोड, व मनिषा सुतार,सोनम भगत यांनी केली आहे.


महाराष्ट्र पोलीस
वानवडी पोलीस ठाणे
पुणे शहर
फोन नं. : ०२०-२६८२४९८१
SUNPOWER INDIA
An EPC Company
वानवडी पोलीस स्टेशन